**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

- **अपघातग्रस्त रुग्णांना एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार मिळणार.**
- **जेईई मुख्य परीक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार.**
- **दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग द्वारे आज पासून ते २४ एप्रिल पर्यन्त "ऑपरेशन महिला सुरक्षा.**
- **४४ पूर्णांक १ अंश सेल्सिअस अकोला जिल्हा विदर्भात सर्वात उष्ण.**

कॅशलेस उपचार

अपघातग्रस्त रुग्णांसाठी १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी इथल्या मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा त्यांनी आज घेतला. यावेळी योजनेतल्या अंगीकृत रुग्णालयांची संख्या १ हजार ७९२ वरून ४ हजार १८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसंच या योजनेतल्या उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे उपचार समाविष्ट करणं, तसंच प्राथमिक आरोग्य सेवा योजनेत समाविष्ट करण्यासाठी समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. या योजनेतल्या रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

चापेकर बंधू स्मारक

राज्य सरकारच्या सहकार्याने आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि क्रांतिवीर चापेकर बंधू स्मारक समितीच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या क्रांतिवीर चापेकर बंधू स्मारकाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाला दूरदृश्यप्रणालीद्वारे संबोधित

केलं. चापेकर बंधू हे छत्रपती शिवरायांच्या कार्य कर्तृत्वाने प्रेरित असल्याचे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले,

***खरं म्हणजे चाफेकर बंधू जे आहेत हे छत्रपती शिवरायांच्या एकूण चरित्र्यामुळे भारावलेले होते. छत्रपती शिवरायांवर त्यांनी पोवाडे रचले आणि छत्रपती शिवरायांचीच प्रेरणा चाफेकर बंधूना त्याठिकाणी सातत्याने मिळत होती आणि म्हणून हा जो आपला अतिशय जाज्वल्य अशाप्रकारचा इतिहास आहे कि ज्या इतिहासामध्ये खऱ्या अर्थाने ज्याला आपण इंग्रजीत वॉटर शेड मूव्हमेंट म्हणतो तशा प्रकारचा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात चाफेकर बंधूनी केलेला रँड चा वध हा क्रांतिकारकांच्या इतिहासामध्ये वॉटर शेड मूव्हमेंट आहे कि ज्यातला इतिहास पूर्णपणे बदलला.***

हे स्मारक चापेकर बंधूंच्या अतुलनीय शौर्याचा साक्षीदार असून, प्रत्येक शालेय विद्यार्थ्यानं हे स्मारक पाहिलं पाहिजे, यातून प्रेरणा मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी, संग्रहालयाच्या कामासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असं आश्वासन दिलं.

गुड फ्रायडे

जगभरातले ख्रिश्चन धर्मीय आज गुड फ्रायडे निमित्त श्रद्धेनं आणि बंधुत्वाच्या भावनेनं प्रभु येशुचे स्मरण करत आहेत. प्रभू येशूला आजच्या दिवशी सुळावर चढवल्याचं मानलं जातं. या निमित्तानं विविध ठिकाणच्या चर्चमधून विशेष प्रार्थनेसह अनेक धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुड फ्रायडे निमित्त प्रभू येशुच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. हा दिवस आपल्याला प्रेम, सहानुभूती, दयाळूपणा आणि करुणेची प्रेरणा देत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

जेईई

जेईई मुख्य परिक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. जेईई मेन २०२५ सत्र २ च्या अंतिम उत्तरपत्रिका आज दुपारी २ वाजेपर्यंत जेईई मेन वेबसाइटवर

डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध असतील असं राष्ट्रीय चाचणी संस्थेनं एका निवेदनात म्हटलं आहे.

ऑपरेशन महिला सुरक्षा

ऑपरेशन महिला सुरक्षा अंतर्गत महिला प्रवाशांना सुरक्षिततेबद्दल जागरूक करण्यासाठी रेल्वे बोर्डाच्या सूचनांनुसार रेल्वे सुरक्षा दल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे/नागपूर विभागाकडून जागरूकता मोहीम राबविण्याबाबत येत आहे. "ऑपरेशन महिला सुरक्षा" अंतर्गत महिला प्रवाशांना महिला डब्यात एकटे प्रवास करताना सुरक्षा प्रदान करून त्यांचा प्रवास यशस्वी आणि सुरक्षित करण्यात आला आहे. 'ऑपरेशन महिला सुरक्षा' ही मोहीम भारतीय रेल्वेने महिला प्रवाशांमध्ये त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी चालवलेली एक विशेष मोहीम आहे..रेल्वे संरक्षण दल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग द्वारे १८.०४.२०२५ ते २४.०४.२०२५ या कालावधीत "ऑपरेशन महिला सुरक्षा" अंतर्गत महिलांच्या सुरक्षेसाठी एक विशेष मोहीम राबवणार आहे.

टोल संकलन

येत्या १ मे पासून उपग्रह-आधारित टोल संकलन प्रणाली सुरू करण्यासंबंधीच्या माध्यमांमधील वृत्तांचे सरकारने खंडन केले आहे.  रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने म्हटले आहे की, मंत्रालय किंवा भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या संदर्भात कोणताही निर्णय घेतलेला नाही. टोल प्लाझांमधून वाहनांच्या सुरळीत, अडथळामुक्त वाहतुकीसाठी आणि प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी, निवडक टोल प्लाझांवर FASTag आधारित स्वयंचलित नंबर प्लेट ओळख टोल प्रणाली लागू केली जाईल, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

हर्षवर्धन सपकाळ

मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता आणि  संस्कृती असून आपल्या संस्कृतीवरच घाला घालण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्षाचे सरकार करत आहे. विविधेत एकता ही आपली ओळख असून ती ओळख पुसण्याचा भाजपाचा डाव आहे. पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा असून सरकारने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत केली.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि पंजाब किंग्स यांच्यात लढत होणार आहे. बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सामना होईल. काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं सनरायर्जस हैदराबादवर चार गडी राखून विजय मिळवला. मुंबई इंडियन्सचा संघ सध्या गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहे.

महावितरण

लोकांना सामाजिक विषमतेतून बाहेर काढले पाहिजे तेव्हाच खरे राष्ट्र निर्माण होईल, बाबासाहेब यांचे निम्मे आंदोलन हे सामाजिक जागृती करण्याकरिता होती, अशी माहिती सुप्रसिद्ध साहित्यिक आणि  वक्ते उत्तम कांबळे यांनी दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त महावितरण, नागपूर परिमंडळातर्फे आयोजित विशेष व्याख्याना प्रसंगी ते बोलत होते.  आजही ९० टक्के लोक हे ज्ञानापासून दूर आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी भांडवलशाही व खाजगीकरणाला विरोध केला, प्रत्येक नागरिकांची काळजी घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे व सर्वांना समान संधि मिळाला पाहिजे हेच बाबासाहेबांनी आपणास संविधान च्या माध्यमातून सांगितले असल्याचेही कांबळे यावेळी म्हणाले.

आस्था भिक्षेकरी

नागपूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी महापालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत सुरू असलेल्या आस्था भिक्षेकरी निवारागृहाला भेट दिली आणि  तेथील सोयीसुविधांची पाहणी केली.  भिक्षेकरी निवारागृहातील लाभार्थ्यांना विविध कौशल्य प्रशिक्षण देण्याची सूचना त्यांनी यावेळी केली. निवारागृहातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात वैष्णवी बी. यांनी  निर्देश दिले.

संस्कृति का पांचवां अध्याय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणांवर आधारीत संस्कृति का पांचवां अध्याय या पुस्तकाचं प्रकाशन आज नवी दिल्लीत होणार आहे. या पुस्तकाचं प्रकाशन जुना आखाड्याचे प्रमुख आचार्य महामंडलेश्वर पूज्य स्वामी अवधेशानंद गिरी महाराज

यांच्या हस्ते केलं जाणार आहे. राम बहादूर यांनी पुस्तकाची प्रस्तावना लिहिली असून भाषणांचं संकलन डॉक्टर प्रभात ओझा यांनी केलं आहे. या पुस्तकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संस्कृती, परंपरा, अध्यात्मिक मूल्य आणि संस्कृतिक वारसा या विषयांवर दिलेल्या भाषणांचं संकलन करण्यात आलं आहे.

कोब्रा बटालियन

जम्मू आणि काश्मिरमधल्या दहशतवादी कारवायांना तोंड देण्यासाठी केंद्रीय राखीव पोलिस दलानं विशेष कोब्रा बटालियनची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. नक्षलग्रस्त राज्यांमध्ये घनदाट जंगलात लढण्यासाठी १७ वर्षांपूर्वी, निमलष्करी दल म्हणून कोब्रा बटालियनची स्थापना करण्यात आली. मध्य प्रदेशात नीमच जिल्ह्यात काल दलाच्या ८६व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सीआरपीएफचे महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंह यांनी ही घोषणा केली.

वारसा दिन

आज जागतिक वारसा दिन आहे. दरवर्षी १८ एप्रिल रोजी हा दिवस सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचा सन्मान आणि संरक्षण करण्यासाठी साजरा केला जातो. 'आपत्ती आणि संघर्षांमुळे धोक्यात आलेला वारसा' ही या वर्षीच्या वारसा दिनाची संकल्पना आहे. गेल्या काही वर्षांत, जागतिक वारसास्थळांच्या यादीत भारतातल्या स्थळांनी स्थान पटकावलं आहे. जागतिक वारसा यादीत सध्या भारतातली ४३ स्थळं आहेत. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने आजच्या जागतिक वारसा दिनानिमित्त देशभरातल्या सर्व ASI-संरक्षित स्मारकांमध्ये मोफत प्रवेश जाहीर केला आहे.

हवामान

४४ पूर्णांक १ अंश सेल्सिअस अकोला जिल्हा विदर्भात सर्वात उष्ण ठरला असून सातत्याने अकोल्यात तापमान 43-44 अंश सेलसियस दरम्यान आहे. याठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून स्थानिकांना सतर्क राहण्यास आणि ऊनहापासून बचाव करण्यास सांगण्यात आले आहे. अकोला पाठोपाठ यवतमाळ इथं 43.4 तर चंद्रपूरचा 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. वर्धा, नागपूर, अमरावती, वाशिम या सर्व जिल्ह्यांमध्ये

तापमान 41 ते 42 अंश दरम्यान आहे. आगामी काही तासात विदर्भातील नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यांसह अत्यंत हलक्या स्वरूपाच्या पर्जन्यवृष्टीची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय वर्धा, अमरावती, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये देखील विरळ ठिकाणी हलका पाऊस पडू शकतो.

*****